# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान

**"मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान "** हे अभियान दिनांक - ०६ ऑगस्ट २०२५ रोजीचे ग्रामविकास विभागाकडील शासननिर्णयानुसार राबविणेत येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश केवळ गावांना पुरस्कार देणे नसून गावा गावांमध्ये एक निकोप स्पर्धा निर्माण करणे, सुशासन प्रस्थापित करणे आणि गावाला आत्मनिर्भर करणे हा आहे.अभियानाचे प्रमुख घटक खालील प्रमाणे आहेत.

१ .सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे.
२ .सक्षम पंचायत (स्वनिधी,CSR व लोक वर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थीक दृष्ट्या सक्षम करणे)
३.जल समृद्ध,स्वच्छ व हरित गांव निर्माण करणे.
४.मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे.
५.गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे.
६.उपजिविका विकास ,सामाजिक न्याय
७.लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे

- **अभियानाचा कालावधी** – १७ सप्टेंबर ते ३१ मार्च २०२६
- **मुल्यंमापन -** तालुका ,जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील निवड/मुल्यमापन समिती मार्फत (परिशिष्ट ब १०० गुण)

- **बहुस्तरीय पुरस्कार**

| **ग्रामपंचायतीसाठी बहुस्तरीय पुरस्कार** | | | |
|---|---|---|---|
| तालुकास्तरावरील ३ अत्युकृष्ट ग्रामपंचायती | जिल्हास्तरावरील ३ अत्युकृष्ट ग्रामपंचायती | विभागस्तरावरील ३ अत्युकृष्ट ग्रामपंचायती | राज्यस्तरावरील ३ अत्युकृष्ट ग्रामपंचायती |
| प्रथम- १५ लाख | प्रथम - ५० लाख | प्रथम १ कोटी | प्रथम-५ कोटी |
| द्वितीय- १२ लाख | द्वितीय- ३० लाख | द्वितीय ८० लाख | द्वितीय- ३ कोटी |
| तृतीय -८ लाख | तृतीय- २० लक्ष | तृतीय- ६० लक्ष | तृतीय- २ कोटी |
| २ विशेष पुरस्कार ५ लाख | | | |

| पंचायत समितीसाठी बहुस्तरीय पुरस्कार | | | |
|---|---|---|---|
| विभागस्तरावरील ३ अत्युकृष्ट पंचायत समिती | प्रथम १ कोटी | द्वितीय - ७५ लाख | तृतीय - ६० लाख |
| राज्यस्तरावरील ३ अत्युकृष्ट पंचायत समिती | प्रथम २ कोटी | द्वितीय - १.५० कोटी | तृतीय - १.२५ कोटी |

| जिल्हा परिषद राज्यस्तरीय पुरस्कार | | |
|---|---|---|
| प्रथम ५ कोटी | द्वितीय - ३ कोटी | तृतीय - २ कोटी |

- **तालुकास्तरीय कार्यशाळा** – १२ तालुक्यामध्ये मान्यवरांचे उपस्थितीत घेणेत आल्या
- **जिल्हा स्तरीय कार्यशाळा -** १५ -०९ -२०२५ प्रमुख उपस्थिती - मा.ना.श्री.जयकुमार गोरे मंत्री ग्रामविकास व मा.ना.श्री.प्रकाश आबिटकर मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण तथा पालक मंत्री, कोल्हापूर
- **विशेष ग्रामसभा -** जिल्ह्यातील १०२६ ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभा घेणेत आल्या आहेत. .
- **जिल्हास्तरीय कक्ष-** जिल्हास्तरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कक्ष स्थापन करणेत आला आहे.जिल्हास्तरावरूनअभियानाच्या प्रचार प्रसिद्धी साठी सोशल मिडिया प्रभावीपणे सुरु आहे.(youtube,instagram,facebook,whatsapp channel इ.)
- **तालुकास्तरीय कक्ष-** तालुकास्तरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कक्ष स्थापन करणेत आला आहे.
- **पालक अधिकारी/ संपर्क अधिकारी -** सर्व ग्रामपंचायती साठी ग्रामस्तरावर पालक अधिकारी नेमणेत आले असून जिल्हा स्तरावरून देखील खाते प्रमुखांना तालुका पालक अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.
- **चित्रीकरण** – चित्रिकरणासाठी जिल्ह्यातून एकूण **६५** ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी आजअखेर **सर्व** ग्रामपंचायतीचे चित्रीकरण पूर्ण करणेत आले आहे.
- **सेलिब्रिटी - श्री भाऊ कदम** यांचे उपस्थिती दि. ६ मार्च २०२६ रोजी ग्रामपंचायत पिराचीवाडी ता.कागल,ग्रामपंचायत मजरे कासारवाडा, ता.राधानगरी व ग्रामपंचायत अंबप ता. हातकणंगले यथे कार्यक्रम पार पडले आहेत.

- **प्रत्येक तालुक्यातील २०%प्रमाणे होणाऱ्या जिल्ह्यातील एकूण २०६ ग्रामपंचायतीची निवड करून शासनाच्या MSPRA पोर्टलवर “MAP ” केलेल्या आहेत .**
- **ग्रामपंचायतीनी स्व:मुल्यांकन प्रस्ताव सादर करणे – (०१एप्रिल २०२६ ते २५ एप्रिल २०२६)** सहभागी ग्रामपंचायतीनी अभियानाच्या अधिकृत वेब साईट वर login करून आपला स्व:मुल्यांकन प्रस्ताव सादर करणे. **(सध्या पोर्टल uapdate करणे काम सुरु आहे )**
- **तालुका स्तरीय मूल्यमापन – (२६एप्रिल ते १५ मे २०२६) -** गटविकास अधिकारी यांना त्यांचे login मध्ये उपलब्ध करून दिलेल्या यादीनुसार दररोज किमान १ या प्रमाणे ग्रामपंचायतींचे मूल्यमापन करून त्याच दिवशी पोर्टल वर upload करणे बंधनकारक आहे.

| जिल्हा परिषद रत्नागिरी | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | मूळ पंचायत समितीचे नाव | भेट द्यावयाच्या पंचायत समितीचे नाव | जिल्हा परिषदेचे नाव |
| 1 | चिपळूण | गडहिंग्लज | कोल्हापूर |
| 2 | दापोली | करवीर | कोल्हापूर |
| 3 | गुहागर | भुदरगड | कोल्हापूर |
| 4 | खेड | शिरोळ | कोल्हापूर |
| 5 | लांजा | कागल | कोल्हापूर |
| 6 | मंडणगड | हातकणंगले | कोल्हापूर |
| 7 | राजापूर | चंदगड | कोल्हापूर |
| 8 | रत्नागिरी | आजरा | कोल्हापूर |
| 9 | संगमेश्वर | राधानगरी | कोल्हापूर |
| जिल्हा परिषद ठाणे | | | |
| 10 | मुरबाड | पन्हाळा | कोल्हापूर |
| 11 | भिवंडी | गगनबावडा | कोल्हापूर |
| 12 | कल्याण | शाहुवाडी | कोल्हापूर |

- **जिल्हास्तरीय समिती –** जिल्हा स्तरीय मूल्यमापन अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करावयाची असून सदर समितीत १ पत्रकार संघातील सदस्य व इतर ४ सदस्य यांची नियुक्ती मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावयाची आहे .
- **जिल्हास्तरीय मूल्यमापन- (१६ मे २०२६ ते ०५ जून २०२६) -**
  मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने मूल्यमापन करावयाची जिल्हा परिषद **– “सिंधुदुर्ग “**